# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी क्र.: २४१३५७९७,२४१५११८५ • E-mail: admin@mucbf.com • web: www.mucbf.com


## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **२९ सप्टेंबर, २०२१** रोजी **दुपारी १२:३० वाजता** सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सींग/इतर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स द्वारे ‘भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१’ येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.

२. दि. २४ मार्च, २०२१ रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा. अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०२०-२१ सालचा वार्षिक अहवाल, ३१ मार्च, २०२१ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०२०-२१ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२१ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.

५. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६. फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता अंतर्गत लेखापरिक्षक आणि शासन मान्यताप्राप्त लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक :०७/०९/२०२१

ठिकाण : वडाळा, मुंबई-३१

**सायली भोईर**

मुख्य कार्यकारी व सचिव

टिप : १) किमान गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेनंतर (दुपारी २:०० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.

३) सदर सभेत मास्क वापरणे, तसेच सुरक्षित अंतर पाळणेही बंधनकारक आहे.

४) आर्थिक वर्ष २०२०-२१ चा वैधानिक लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण केलेला अहवाल, दोषदुरुस्ती अहवालासहीत फेडरेशनच्या वेबसाईटवर तसेच प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे.